‘संत साहित्य हे जगण्याची उमेद देणारे ऊर्जा स्त्रोत’

संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन

संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन पोपटराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. समवेत सतीश मुळे, डॉ. दिलीप धनेश्वर, संजय खेले, डॉ. राजा ठाकूर, डॉ. राजेश गायकवाड, प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : संत साहित्य मानवाला जगण्यासाठी उमेद देणारे सर्वांत मोठे ऊर्जा स्रोत आहे. मात्र, या साहित्यातील संदेश व शिकवण मनुष्य विसरला, निसर्गाशी दुरावा घेत पैशाच्या मागे लागला. भविष्यातील वाटचालीसाठी संत परंपरा व मानवतावाद टिकवणे आवश्यक असून, संतांच्या विचारांवर कृती करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळ व येथील आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराजांच्या उपस्थितीत व पोपटराव पवार यांच्या हस्ते हरिनामाच्या जयघोषात झाले, त्यावेळी पवार बोलत होते.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतीश मुळे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर, सचिव संजय खेले, जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर, साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड व डॉ. बी. जी. शेखर पाटील, प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, निवृत्त प्राचार्य प्रकाश टाकळकर, अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष के. डी. धुमाळ, राजेंद्र गाडगीळ, प्राचार्य सुनील पंडित आदी उपस्थित होते.

महंत आदिनाथ शास्त्री महाराज म्हणाले, श्रद्धेने पाहिल्यावर सर्वांमध्ये परमेश्वर दिसतो. श्रद्धा नसेल तर देवातही देव दिसत नाही. त्यामुळे जीवनात व परमार्थात श्रद्धेला व भावनेला महत्त्व आहे. कोणाचाही मत्सर न करता कायम चांगले, सत्य व कमी बोलणे ही तपश्चर्याच आहे.

प्रास्ताविकात डॉ. दिलीप धनेश्वर यांनी संमेलनाची माहिती दिली. सतीश मुळे यांनी जिल्ह्यातील संत परंपरा व कार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन अनिल सोमाणी यांनी केले. सुनील पंडित यांनी आभार मानले. डॉ. राजू रिकल, प्रा. मीरा पठारे, प्रा. भीमराज पठारे, प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, डॉ. स्वप्नील सहस्त्रबुद्धे, ज्ञानेश्वर दुधाडे आदींनी कार्यक्रमांचे नियोजन केले. संमेलन स्थळाला ‘संतसाहित्य नगरी’ असे नाव देण्यात आले आहे.

ग्रंथ दिंडी, भारूड, गोल रिंगण

संमेलनाची सुरुवात ग्रंथ दिंडीने उत्साहात झाली. विविध देवस्थानांच्या दिंड्या, शालेय विद्यार्थ्यांच्या बालदिंड्या, भजनी मंडळे, विविध पथकांचा सहभाग होता. सजवलेल्या रथातील पालखीत सार्थ ज्ञानेश्वरी, श्रीसकळसंत गाथा, दासबोध व श्री ज्ञानेश्वरी चिंतन ग्रंथ ठेवले होते. श्रीगोंद्याच्या संत शेख महमंद महाराजांचा रथ व अश्व होता. दिंडीत स्पर्धक शाळांचे विद्यार्थी पारंपरिक वारकरी वेशभूषेत सहभागी होते. नागरिकांनी पुष्पवृष्टी करून दिंडीचे स्वागत केले. प्रोफेसर कॉलनी चौकात दिंडीचे भारुड रंगले तर माउली सभागृहाजवळ दिंडीचे गोल रिंगण रंगले.

जिल्हा बँकेत तिसरी शक्ती?

उर्वरित १० जागांसाठी मतदान; यंदाच्या निवडणुकीत थोरात-विखे एकत्र

मोहनीराज लहाडे, लोकसत्ता

अहिल्यानगर : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २१ जागांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्या, आता उर्वरित १० जागांसाठी मतदान होणार आहे. परस्परांचे कट्टर विरोधक भाजप नेते तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे व काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात प्रथमच एकत्र आले. त्यांच्या युतीने बिनविरोधद्वारे बँकेमध्ये आजच वर्चस्व निर्माण केले आहे. निवडणुकीतून निर्माण होऊ पाहणारे आव्हान ‘बिनविरोधच्या धुराळ्या’त विरोधक विखुरले आणि सक्षमपणे उभे राहू शकले नाही. आता उर्वरित जागांच्या निवडणुकीतून बँकेत तिसरी शक्ती किती प्रमाणात उदयाला येणार, याकडे लक्ष राहील.

जिल्हा बँकेच्या आजवर ज्या निवडणुका झाल्या त्या प्रामुख्याने बाळासाहेब थोरात गट विरुद्ध राधाकृष्ण विखे गट अशाच प्रकारे रंगल्या. नव्हेतर जिल्ह्याच्या राजकारणाचा तो स्थायीभावच झाला होता. दोघे पूर्वी एकाच म्हणजे काँग्रेस पक्षात असताना आणि नंतर वेगवेगळ्या पक्षात असतानाही अशाच पद्धतीने रंगत होती. काँग्रेसमधील थोरात गटाने ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे सहाय्य मिळवत बँकेत वेळोवेळी विखे गटाला मात दिली. त्यामुळे थोरात गटाचे बँकेतील सत्तेवर बहुतांशी वर्चस्व राहिले.

अशी परिस्थिती असताना अचानक बँकेच्या यंदाच्या निवडणुकीत थोरात-विखे प्रथमच एकत्र आले. त्याला कारणही तसेच घडले. यंदा बँकेच्या निवडणुकीत भाजप नेते तथा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके यांच्या भूमिकेने निवडणुकीत आव्हान निर्माण होऊ पाहत होते. हे आव्हान थोपवण्यासाठी जिल्ह्यातील साखर कारखानदारांना एकत्र करत थोरात-विखे एकत्र आले.

त्यापूर्वी दुष्काळाचे कारण देत निवडणूक बिनविरोध करण्याचा धुराळा उठवण्यात आला. त्यातून हे आव्हान काही प्रमाणात थोपवले गेले. राम शिंदे व नीलेश लंके यांनी विरोधात ठोकलेले शड्डू एकत्रित, सक्षमपणे उभे राहू शकले नाहीत.

मात्र, ११ जागा बिनविरोध ठरल्या. त्यामध्ये थोरात गटाच्या ६, विखे गटाच्या ४ अशा थोरात-विखे युतीच्या एकत्रित १० व राम शिंदे गटाची १ अशा एकूण ११ जागा बिनविरोध झाल्या. म्हणजे बदललेल्या राजकीय परिस्थितीही थोरात गटाचे बँकेवर वर्चस्व कायम राहिले आहे. राम शिंदे गटाचा सध्यातरी बिनविरोध निवडीद्वारे बँकेत चंचूप्रवेश झालेला आहे. अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप कुटुंबातील तीन संचालक अनपेक्षितपणे थोरात-विखे युतीमध्ये बिनविरोध ठरले. ११ पैकी ७ जागा सेवा संस्थांच्या आहेत. तालुकातालुक्यातील सेवा संस्थांवर तेथील प्रस्थापितांचे वर्चस्व असल्याने संबंधित नेत्यांनी आपले कौशल्य वापरत बिनविरोध करून घेतल्या. त्याचा आणि बिनविरोधच्या धुराळ्याचा संबंध नाही.

आणखी ३ जागा राम शिंदे गट लढवत आहे तर नीलेश लंके व शिवसेनेचे (शिंदे गट) माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र गट एकूण ७ जागा लढवत आहे. सहकाराच्या नावाखाली सर्वपक्षीय नेते या तीन पॅनेलमध्ये परस्परांच्या विरोधात एकत्र आहेत. बिनविरोध निवडणुकीच्या चर्चेत जिल्ह्यातील सर्वच नेते सहभागी झाले होते, मात्र परस्परांवरील कुरघोडीतून अखेर निवडणूक लादली गेलीच आणि राम शिंदे, नीलेश लंके गट अलगद बाजूला पडला. ते अपेक्षितच होते.

यापूर्वी विखे यांच्या विरोधात असणारे थोरात-लंके विभक्त झाले. एकाच पक्षात असणाऱ्या विखे- शिंदे या दोन विरोधकांतील कटुता बँक निवडणुकीने आणखी वाढली. राम शिंदे यांनी त्यांच्या समर्थकांसाठी चार जागांची मागणी केली, ती अर्थातच दुर्लक्षित केली गेली. नीलेश लंके यांचा समावेश होणे असंभवच होते. घडलेही तसेच.

शिंदे, लंके प्रथमच निवडणुकीत

थोरात-विखे गटातील उमेदवार किंवा बिनविरोध ठरलेले बहुतांशी साखर कारखानदार आहेत. त्या विरोधातील राम शिंदे व नीलेश लंके प्रथमच आणि स्वतंत्रपणे बँकेच्या निवडणुकीत उतरले आहेत. निवडणूक होत असलेल्या दहा जागांमधून राम शिंदे आणि नीलेश लंके यांचे गट किती जागा मिळवतात, यावर जिल्हा बँकेत तिसऱ्या शक्तीची ताकद निर्माण होणार आहे. शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून ओळखली जाणारी जिल्हा बँक आता साखर कारखानदारांची म्हणून ओळखली जात आहे. शेतकऱ्यांकडील थकबाकीपेक्षा साखर कारखानदारांकडे थकबाकी अधिक निर्माण झाली आहे. जिल्हा बँकेत उदयाला येणाऱ्या तिसऱ्या शक्तीला हा ताळमेळ ठेवावा लागणार आहे.

राधाकृष्ण विखे यांची माहिती

गोदावरीचे एक आवर्तन रब्बी, उन्हाळी हंगामासाठी

राहाता : गोदावरी धरण समूहामध्ये उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करून, लाभक्षेत्राला रब्बीसाठी एक आणि उन्हाळी हंगामासाठी एक अशा दोन आवर्तनांचे नियोजन सध्या करण्यात आले आहे. परिस्थितीनुसार पुढील निर्णय करण्यात येतील, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली. कोणत्याही परिस्थितीत कालव्यांचे संपूर्ण अस्तरीकरण होणार नाही, संपूर्ण कालव्याचे अस्तरीकरण होणार असल्याचा शेतकऱ्यांमधील समज चुकीचा असल्याचे त्यांनी सांगितले.

गोदावरी कालवा सल्लागार समितीची बैठक शनिवारी विखे यांच्या अध्यक्षतेखाली राहाता येथे झाली. आमदार आशुतोष काळे, हेमंत ओगले, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, राहात्याचे उपनगराध्यक्ष डॉ. विजय सदाफळ, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, गणेश कारखानाचे माजी अध्यक्ष नारायण कार्ले तसेच अधिकारी आदी उपस्थित होते.

विखे यांनी सांगितले की, पर्जन्यमानामध्ये या वर्षी ५० टक्क्यांपेक्षा जास्त तूट असल्याने पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा लागणार आहे. जलसंपदा विभागाच्या नियोजनाला शेतकऱ्यांचेही सहकार्य अपेक्षित आहे. बेकायदा वाळू उपशामुळे नदीकाठ पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून, शेवटच्या गावापर्यंत आवर्तनाचे पाणी पोहोचू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे, असे विखे म्हणाले आमदार काळे, आमदार ओगले, स्नेहलता कोल्हे यांनी विविध मागण्या मांडल्या.

> दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकऱ्यांकडील पाणीपट्टीबाबत सरकार संवेदनशीलतेने निर्णय करीत आहे. यासाठी शेतकऱ्यांनी आपली चालू पाणीपट्टी वेळेत भरावी तसेच लाभक्षेत्रातील विविध नगरपालिकांकडे असलेल्या पाणीपट्टीच्या थकबाकीबाबतही गांभीर्याने कायदेशीर निर्णय घेण्यात येणार आहे. नाबार्डच्या माध्यमातून उपलब्ध विशेष निधीमधून कालव्यांच्या नूतनीकरणाची सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्यात येणार आहे.
> – **राधाकृष्ण विखे**, पालकमंत्री

रस्ता बंद केल्याने आंबिजळगाव ग्रामस्थांचे उपोषण

कर्जत : आंबिजळगाव येथील अनेक पिढ्यांपासून वहिवाटीचा रस्ता बंद केल्याने परिसरातील नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी यांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. दूध व शेतीमाल, रुग्णालय, स्मशानभूमीचा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे. यामुळे ग्रामस्थांनी कर्जत तहसील कार्यालयाबाहेर उपोषण सुरू केले आहे.

आंदोलनासंदर्भात प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष सुदाम निकत यांनी माहिती दिली. आंदोलनात फय्याज शेख, लक्ष्मण निकत, जाकीर शेख, बापू शिंदे, अंगद निकत, राहुल अनारसे, दशरथ निकत, हनुमंत निकत, अनिल निकत, धनंजय निकत, रमेश निकत, अनिल गायकवाड, शंकर मोरे, संदीप मोरे आदी सहभागी झाले आहेत.

उपोषणस्थळी कर्जतचे माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रघुनाथ काळदाते यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला व प्रशासनाने तातडीने तोडगा काढून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली. सुदाम निकत म्हणाले, या रस्ताबंदीमुळे ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली आहे. मुलांना शाळेत जाणेही कठीण झाले असून, त्यांच्या शिक्षणात खंड पडत आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्णयाची प्रशासन कधी अंमलबजावणी करणार आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

शिर्डी विमानतळावरून हैदराबादसाठी आणखी चार उड्डाणे

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उद्या रविवारपासून आणखी चार उड्डाणांची भर पडणार आहे. हैदराबाद-शिर्डी मार्गावर दोन विमाने येणार आहे. शिर्डीहून हैदराबादकडे दोन विमाने रवाना होणार आहेत. यामुळे विमानतळावरील दैनंदिन उड्डाणांची संख्या वाढणार असल्याने ये जा करणाऱ्या विमानांची संख्या ८ वरून १२ होणार आहे. शिर्डी परिसरातील प्रवाशांना हवाई प्रवासासाठी आणखी एक पर्याय उपलब्ध होणार आहे.

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी देशाच्या विविध भागांतून भाविक येत असतात. शिर्डी विमानतळामुळे भाविकांचा प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होते. आता हैदराबादसाठी हवाई संपर्क वाढणार असल्याने या भागातील साईभक्तांना शिर्डीत येणे अधिक सोयीचे होण्याची अपेक्षा आहे. नव्या वेळापत्रकानुसार हैदराबादहून शिर्डीकडे येणारे पहिले विमान सकाळी ८.१० वा., तर दुसरे विमान दुपारी ४ वा. शिर्डीत दाखल होईल. शिर्डीहून हैदराबादकडे जाणारे पहिले विमान सकाळी ८.३० वा., तर दुसरे विमान सायंकाळी ४.२० वा. उड्डाण करेल. या नव्या सेवांमुळे हैदराबाद आणि शिर्डी यांच्यातील हवाई संपर्क अधिक मजबूत होणार आहे.

शिर्डी विमानतळावरील उड्डाणे वाढल्यामुळे साईभक्तांसह व्यावसायिक प्रवाशांनाही फायदा होण्याची अपेक्षा आहे. विमानसेवेचा विस्तार झाल्यास शिर्डीतील हॉटेल व्यवसाय, टॅक्सीचालक, पर्यटन क्षेत्र आणि परिसरातील अन्य व्यावसायिकांना त्याचा लाभ होऊ शकतो तसेच कोपरगाव, राहाता आणि परिसरातील नागरिकांनाही विमानप्रवासासाठी शिर्डी विमानतळाचा उपयोग होणार आहे. हे सर्व विमानसेवा इंडिगो कंपनीमार्फत सुरू आहे.

शिर्डीच्या धार्मिक आणि पर्यटन क्षेत्राच्या दृष्टीने विमानसेवेचा विस्तार महत्त्वाचा मानला जात आहे. शिर्डी विमानतळावरून यापूर्वी सुरू असलेल्या विमानसेवांमध्ये हैदराबाद, चेन्नई, बंगळुरू आणि दिल्ली या मार्गांचा समावेश आहे. भविष्यात आणखी शहरांसाठी विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

लोकसत्ता Classifieds

जागासंबंधी

६ एकर उपजाऊ कृषी जमीन विक्रीस- वडनेर- पार्नेर, अहमदनगर. मालक- ९८१९३८०२०२.
0071067443-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

Chola Enter a better life

चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : “चोला क्रेस्ट”, सी-54 व 55, सुपर बी-4, थिरू व्ही. का. इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नई – 600032. **शाखा पत्ता :** चौथा मजला, ऑफिस नं. 419 ते 427, औरम बिझनेस अँड कमर्शियल हब, गरुड हॉस्पिटलजवळ, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर (महाराष्ट्र) – 414003.

सिक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत मागणी नोटीस

आपण, खाली नमूद केलेले कर्जदार / तारणदार, यांना याद्वारे कळविण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत कंपनीने आपल्या विरोधात कार्यवाही सुरु केलेली आहे. सदर अधिनियमाच्या कलम 13(2) अंतर्गत कर्जदारांना नोंदणीकृत टपाल (पोच पावतीसह) पाठविण्यात आलेली नोटीस आपल्यापर्यंत न पोहोचता परत आली आहे. म्हणूनच, आपणास याद्वारे सूचित करण्यात येते की, या प्रकाशनाच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत, संबंधित खात्याविरुद्ध नमूद केलेली थकीत कर्ज रक्कम तसेच त्यावर होणारे व्याज अदा करावे. तसे न केल्यास, कंपनी सदर अधिनियमाच्या कलम 13 उपकलम (4) अन्वये आपले अधिकार वापरून, खाली नमूद केलेल्या तारण मालमत्तेची अंमलबजावणी करून, आपली देणी व्याज व खर्चासह वसूल करण्याची कार्यवाही करेल. हे नमूद करण्याची आवश्यकता नाही की, ही नोटीस कंपनीला उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायांवर कोणताही प्रतिकूल परिणाम न करता आपणास पाठवण्यात आली आहे.

अनु क्र.	कर्ज खाते क्रमांक आणि कर्जदाराचे/कर्जदारांचे नाव व पत्ता	कर्जाची रक्कम	मागणी सूचनेची तारीख आणि थकबाकीची रक्कम
1.	कर्ज खाते क्र.: X0HEAHD00003066425 आणि HE02AHD0000002530 **1. श्रीनिवास चंद्रकांत कुलकर्णी, यशदा एंटरप्रायजेस,** एल-197/1, नागापूर, लामखेडे चौक, एमआयडीसी, निंबळक रोड, अहमदनगर, महाराष्ट्र – 414111. **2. अपर्णा श्रीनिवास कुलकर्णी 1 व 2 यांचा पत्ता:** गट नं. A/34, श्रीरामकृपा, समता नगर, समता हॉलजवळ, राज्य कर्मचारी वसाहत, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र – 414003. **2.** गट नं. B/34, श्रीरामकृपा, समता नगर, समता हॉलजवळ, राज्य कर्मचारी वसाहत, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र – 414003. **3. गोविंद रामचंद्र कुलकर्णी,** फ्लॅट नं. 2, आलोक अपार्टमेंट, प्रोफेसर कॉलनी, आकाशवाणी केंद्राजवळ, अहमदनगर, महाराष्ट्र – 414001. **4. सुधीर वसंतराव राक्षसभुवनकर,** फ्लॅट नं. 40, साई निकेतन अपार्टमेंट, वरद दत्त मंदिराजवळ, अहिल्या नगरी, पाइपलाइन रोड, अहमदनगर, महाराष्ट्र – 414003. **5. यशदा एंटरप्रायजेस, त्यांचे भागीदार श्रीनिवास चंद्रकांत कुलकर्णी, गोविंद रामचंद्र कुलकर्णी व सुधीर वसंतराव राक्षसभुवनकर यांच्यामार्फत. 3, 4 व 5 यांचा पत्ता:** एल-197/1, नागापूर, लामखेडे चौक, एमआयडीसी, निंबळक रोड, अहमदनगर, महाराष्ट्र – 414111.	रु. 31,50,000/- आणि रु. 6,15,626/-	12/10/2026 12/10/2026रोजी रु. 26,27,312/-करारानुसार व्याजदराने पुढील व्याजासह,
	मालमत्तेचे विवरण :- मालमत्तेचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग प्लॉट नं. 34, एकूण क्षेत्रफळ अंदाजे 361.00 चौ. मी. पैकी दक्षिण बाजूचे 180.5 चौ. मी. क्षेत्रफळ, त्यावरील बांधकामासह (घर), “अहमदनगर जिल्हा राज्य सहकारी कर्मचारी गृह निर्माण संस्था मर्यादित” मध्ये, सर्व्हे नं. 97/2 असलेल्या जमिनीवर बांधलेला, मौजे सावेडी, ता. व जि. अहमदनगर येथे स्थित, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या स्थानिक हद्दीत तसेच दुय्यम निबंधक कार्यालय, अहमदनगर यांच्या कार्यक्षेत्रात.		

दिनांक: 25/10/2026, स्थळ: अहमदनगर **(प्राधिकृत अधिकारी), चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३,४,८ व ९, पहिला मजला, नागापूर पुलाजवळ, नगर–मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

लिलावाद्वारे विक्री सूचना

खाली नमूद केलेल्या वाहनांचा **‘जिथे आहे जसे आहे’ व ‘तिथे जे काही आहे’** या तत्वावर लिलावाद्वारे **दि. १६/११/२०२६** रोजी विक्री करण्यासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. युनियन बँक ऑफ इंडियाला देय असलेल्या डिमांड ड्राफ्टसह असलेल्या पाकिटावर **‘वाहन लिलावामध्ये भाग घेण्यासाठी निविदा’** असा स्पष्ट करून निविदा पाकीट क्षेत्रीय कार्यालयाच्या वर उल्लेख केलेल्या पत्त्यावर पाठवावेत. सर्व निविदा या निविदाकारांच्या समक्ष **दि. १६/११/२०२६ रोजी दु. ३.०० वा. अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयात** उघडण्यात येतील. सर्व निविदाकारांच्या बंद लिफाफ्यामधील सर्वाधिक बोलीची रक्कम ही पुढील लिलावासाठी पहिली बोली मानली जाईल. निविदा सादर करण्यापूर्वी निविदाकारांनी सर्व कागदपत्र संबंधित शाखांमध्ये तपासून घ्यावेत. वाहनाचा लिलाव झाल्यानंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. उच्चतम बोली लावणाऱ्या निविदाकारास पुढील प्रक्रियेसाठी आमंत्रित केलेले जाईल. यशस्वी निविदाराकाची बयाणा रक्कम ही एकूण रकमेत त्याच दिवशी समायोजित करण्यात येईल. उर्वरित रक्कम ही लिलावानंतर सात दिवसांच्या आत किंवा **दि. २३/११/२०२६** रोजी अथवा त्या आधी भरावी लागेल. यशस्वी निविदाकार उर्वरित रक्कम **दि. २३/११/२०२६** पूर्वी भरण्यात अयशस्वी ठरल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येऊन बँक पुन्हा फेरलिलाव प्रक्रिया करेल.

– लिलावाचा तपशील –

अ. क्र.	कंपनी मॉडेल व रजिस्ट्रेशन नंबर	कर्जदार/वाहन मालकाचे नाव	शाखेचे नाव	राखीव किंमत रु.	बयाणा रक्कम रु.	संपर्क व्यक्ती व मोबाईल नंबर
१	Make: **MARUTI SUZUKI** Model: SWIFT VXI (O) CNG, **PETORL/CNG COLOUR-PEARL ARCTIC WHITE** Chassis No:MBHZCDESKRM244476 Engine No.: **Z12EP1142521** Reg No.: **MH 16 DS 2074** Mfg. Date.: **12/2024** Date of Reg.: **30/03/2025**	श्री. प्रशांत बलराम नकवाल	युनियन बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर मुख्य	३,९०,०००.०० (रुपये तीन लाख नव्वद हजार)	३९,०००.०० (रुपये एकोणचाळीस हजार मात्र)	श्री. किरण शिंदे मो.७३५१४८४८४०

निविदा सादर करण्याचा अंतिम : **दि. १६/११/२०२६ दु. ३.०० पर्यंत.** वाहन परीक्षण तारीख व वेळ : **दि. १५/११/२०२६ रोजी सायं. ५.०० पर्यंत**
वाहन परीक्षण ठिकाण : **वाहन अ.क्र. १ –** युनियन बँक ऑफ इंडिया, सोलापूर मुख्य शाखा.
संपर्क – ८६९८१३३१३१, ७०७७७०७३१३.
लिलावाची तारीख व वेळ : दि. १६.११.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता.
वाहन लिलावाचे ठिकाण : **युनियन बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालयः अहिल्यानगर– पहिला मजला, प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाच्या नंतर, मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११.**
वरील कोणतीही माहिती नंतर चुकीची आढळल्यास त्याला बँक जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी. लिलाव प्रक्रिया कोणतीही पूर्व सूचना न देता कोणत्याही क्षणी रद्द केली जाऊ शकते. लिलाव प्रक्रियेसंबंदीचे सर्व अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत.
टीप – मंजूर झालेल्या लिलावाशी संबंधित सर्व कागदपत्रे केवळ मंजूर निविदाधारकाच्या नावानेच जारी केली जातील.
ठिकाणः अहिल्यानगर
दि. २३/१०/२०२६
सही/– अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय, अहिल्यानगर.

IndiaShelter Home Loans

इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लि.
जंगम वस्तू ताब्यात घेण्याकरिताचे प्रकाशन

शाखा कार्यालय :– कार्यालय क्र. 220, साई मिडास टच, कमर्शियल कॉम्प्लेक्स, मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र, भारत - 414003.
नोंदणीकृत कार्यालय :– सहावा मजला, प्लॉट क्र. 15, इन्स्टिट्यूशनल एरिया, सेक्टर 44, गुडगाव-122002, हरियाणा.

कर्ज खाते क्र. / एपी क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक)	मागणी सूचना दिनांक	ताबा दिनांक
HL41CHLONS000005047672 आणि LA41VLLONS000005076142 / एपी - 10103074 आणि एपी - 10184285	श्री./सौ. अनुसया गुरुराज सावलगी आणि श्री./सौ. शशिकला अनिल सोनी	11-फेब्रुवारी-2026	17-08-2026

कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांना सूचना पाठवूनही, इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड वरील कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांच्याशी त्यांच्या शेवटच्या पत्त्यावर संवाद साधू शकले नाही, हे लक्षात घेऊन ही जाहीर सूचना जारी करण्यात येत आहे. ज्याअर्थी बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनंशीअल ?सेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ?क्ट, 2002 (सरफेसी कायदा) च्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून वर नमूद केलेल्या दिनांकास कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांना मागणी सूचना जारी केली होती. कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार उक्त मागणी सूचनेचे त्यामध्ये नमूद केलेल्या कालावधीत पालन करण्यात अयशस्वी झाल्याने, बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने विशेषतः सदर मागणी सुचनेमध्ये वर्णन केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
याद्वारे सूचना देण्यात येत आहे कि, सदर कर्जदार / सह-कर्जदार / जमीनदार यांनी सुरक्षित मालमत्तेत पडलेल्या वैयक्तिक वस्तू या प्रकाशनाच्या तारखेपासून 48 तासांच्या आत ताबडतोब काढून टाकाव्यात, त्यात अयशस्वी झाल्यास संपूर्णपणे कर्जदारांच्या खर्चाच्या आणि परिणामांच्या जोखमीवर या वैयक्तिक घरगुती वस्तू काढून टाकणे आणि योग्य वाटेल त्या पद्धतीने त्याची विल्हेवाट लावणे याशिवाय प्राधिकृत अधिकाऱ्याकडे दुसरा कोणताही पर्याय नाही, तसेच भविष्यात या संदर्भात कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.
दिनांक : 25-10-2026, **(प्राधिकृत अधिकारी)**
ठिकाण : अहमदनगर **इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लि.**
कोणत्याही प्रश्नासाठी, कृपया श्री. प्रकाश तांदुळकर (+917447426676), श्री. चेतन अग्रवाल (+91 8975441419) यांच्याशी संपर्क साधा.

Hinduja Housing Finance Limited

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमीटेड
कॉर्पोरेट कार्यालय 167-169, 2रा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015. (तामिळनाडू) .
ई-मेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

ई-लिलाव सह विक्रीसाठी सार्वजनिक सूचना (परिशिष्ट- IV A) (नियम 9(1) & 8(6)

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (HHF), **कॉर्पोरेट कार्यालय, 167-169, दुसरा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015. (तामिळनाडू) आणि शाखा कार्यालय:हिंदुजा हाउसिंग फायनान्स लिमिटेड माणिकचंद गॅलरला बिल्डिंग, पहिला मजला, दीप बंगला चौक, सेनापती बापट रोडकडे, पुणे महाराष्ट्र-411016 येथे.** यांचेकडे तारण असलेल्या अचल मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे “अधिनियम”) अंतर्गत विक्री. ज्याअर्थी, HHFL च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील कर्ज खात्यांमध्ये सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत जारी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने पुढील मालमत्तांचा **सांकेतिक ताबा** घेतलेला आहे. ही विक्री **https://www. bankauction.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून करण्यात येईल.

मालमत्तेची तपासणीची तारीख	बयाना रक्कमेची दिनांक	ई-लिलाव दिनांक / वेळ
20/11/2026 11.00 तास -14.00 तास	26/11/2026 सायंकाळी 5 वाजेपर्यंत.	27/11/2026 11:00 तास-13:00 तास

अ. क्र	कर्जदार / सह-कर्जदार / जमानतदार / कर्ज खाते क्र.	अचल मालमत्तेचे वर्णन / सुरक्षित संपत्ती	ताबा दिनांक	आरक्षित किंमत
1.	**1. श्री. कुमार रोहोकले (कर्जदार), 2. श्रीमती अश्विनी रोहोकले (सह-कर्जदार)** MH/AMD/AMDR/ A0 00000255 बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग जमीनीचा एरिया 186.35 चौ.मी दक्षिणेकडिल भाग सीटीएस नं. 18 संपुर्ण एरिया 372.60 चौ.मी आणि जि.पी संपत्ती नं. 20 आणि अनुपातीत त्यावरील बांधकाम मंजुर प्लान नुसार रा. वासुंदे आणि ग्रामपंचायत वासुंदे च्या हद्दीत ता. पारनेर जि. अहमदनगर आणि चतुर्सिमा:- पुर्वः रोड, पश्चिमः श्री. साळुंखे यांच्या मालकिची संपत्ती, उत्तरः सीटीएस नं. 18 चा भाग, ताबा श्री. बबन उगळे यांचा, दक्षिणः श्री झवारे यांच्या मालकिची संपत्ती	11/05/2026 सांकेतिक या दिनांकास एकूण थकबाकी रु. 1481606/- 10/02/2026 पर्यत	रु. 2701500/- बयाना रक्कम रु. 270150/-
2.	**1. श्री संदीप तवाळे (कर्जदार), 2. श्री अविनाश तवाले, 3. श्रीमती लताबाई तवाळे, 4. योगिता तवाळे (सह- कर्जदार) 5. शौला तवाळे (सह- कर्जदार)** MH/AMD/AMDR/A000000162 बोली वाढीव रक्कमः रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	बिगरशेती जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट बेअरिंग नं. 66 क्षेत्रफळ एरिया 2.96 समाविष्ठ सर्वे 69 / 1ए / भाग (संकनकिकृत सर्वे नं. 69 / 1ए / पी / 66) गाव सावेडी, अहमदनगर, सोबत निवासी बांधकाम प्लॉट नं. 66, अहमदनगर महानगरपालिका स्थानिक हद्दित, उपरोक्त जमीनीचा भाग प्लॉट नं. 66. चतुर्सिमा - पुर्व - 12 मी रुंद रोड, पश्चिम - प्लॉट नं. 63, उत्तर - प्लॉट नं. 67, दक्षिण - प्लॉट नं. 65	24/08/2026 सांकेतिक या दिनांकास एकूण थकबाकी रु. 4250022/- 07/05/2026 पर्यत	रु. 10873000/- बयाना रक्कम रु. 1087300/-

अधिक तपशील आणि चौकशीसाठी **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, श्री.रुषिकेश उभाळे- 9823244498 श्री. विक्रम नलावडे – 9405020251, श्री. रितेश गवई – 9011858221, श्री. गणेश पाटील – 9372403099.यांचेशी संपर्क साधावा.**
टीप: अटी व शर्तींबाबत अधिक माहितीसाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्या: https://www.bankauction.com
स्थान: अहमदनगर, दिनांक: 25/10/2026 **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाउसिंग फायनान्स लि.**

UNITY

युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड
पाचवा मजला, टॉवर 1, सीवूड्स ग्रँड सेंट्रल, सेक्टर-40, सीवूड्स, सीवूड्स दरावे च्या वर रेल्वे स्टेशन, नवी मुंबई-400 706.

मागणी सूचना

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 ("अधिनियम") आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 (“नियम") च्या तरतुदी अंतर्गत.
निम्नस्वाक्षरीकार हे सदर अधिनियमांतर्गत युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सदर नियमांमधील नियम 3 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत तसेच अनुच्छेद 13(2) अंतर्गत पुढील कर्जदारांना संबंधित सूचनेत नमूद करण्यात आलेय रकमेचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना पाठवली. निम्नस्वाक्षरीकार यांचा वाजवी विश्वास आहे की, कर्जदार मागणी सूचनेची बजावणी टाळत आहेत, त्यामुळे नियमांनुसार सूचना चिकटवून आणि प्रसिद्ध करून तिची बजावणी केली जात आहे. मागणी सूचनेमधील मजकूर खालीलप्रमाणे आहे :

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार यांचे नाव	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	सुरक्षित मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) -
1	**कर्ज खाते क्र. : USFBNASGCTL000004899** **1. साईकृपा फ्रुट सप्लायर्स त्याचे मालक तुषार नामदेव इनामके यांच्या मार्फत** **2. तुषार नामदेव इनामके** **3. सरला तुषार इनामके** **अ. क्र. 1 करीता पत्ता :** नाशिक पुणे महामार्ग, हॉटेल अभिनंदन जवळ, गुंजाळवाडी, संगमनेर, अहमदनगर, महाराष्ट्र - 422605. **अ. क्र. 2 व 3 करिता पत्ता :** 166/02, गुंजाळवाडी संगमनेर अहमदनगर, महाराष्ट्र - 422605.	**17.08.2026** **रु. 96,54,597.02/–** (रु. शहाण्णव लाख चौपन्न हजार पाचशे सत्त्याण्णव आणि दोन पैसे फक्त) **दि. 17.08.2026 रोजी नुसार एनपीए दिनांक : 03.07.2026**	**तारण मालमत्ता (माहितीच्या सूचनेनुसार) – 1** सर्व्हे क्र. : 165/2, जमिनीचे क्षेत्रफळ : 500.0000 चौरस मीटर, मालमत्तेचा प्रकार : जमीन, इतर वर्णन : मालमत्तेचे वर्णन पुढे चालू : संगमनेर, मालमत्तेचे वर्णन : स. क्र. 165/2, गुंजाळवाडी, पिन कोड - 422605. **तारण मालमत्ता (माहितीच्या सूचनेनुसार) – 2** सर्व्हे क्र. : 166/2, जमिनीचे क्षेत्रफळ : 109.0000 चौरस मीटर, बांधकाम मालमत्ता क्षेत्रफळ : 1979.0000 चौरस फूट, मालमत्तेचा प्रकार : इतर, इतर वर्णन : मालमत्तेचे वर्णन पुढे चालू : बांधलेला बंगला, स. क्र. 166/2, मालमत्तेचे वर्णन : गुंजाळवाडी, संगमनेर, अहमदनगर, पिन कोड - 422605.

कर्जदार यांना याद्वारा सल्ला देण्यात येतो की त्यांनी मागणी सूचनेचे अनुपालन करावे आणि प्रदानाच्या वसुलीच्या तारखेपर्यंत लागू व्याज, अतिरिक्त व्याज, बाउन्स आकार, किंमत व खर्च यासह एकत्रीत या प्रसिद्धीच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत यावर दिलेली आणि त्यात नमूद केलेल्या मागणी रकमेचे प्रदान करावे. कर्जदार यांनी नोंद घ्यावी की युएसएफबीएल सुरक्षित धनको आहेत कर्जदार द्वारा लाभ घेतलेली कर्ज सुविधा कर्जदारद्वारा गहाण ठेवलेल्या सुरक्षित मत्ता म्हणून असलेल्या स्थावर मालमत्तेच्या अनुसार सुरक्षित कर्ज आहे. जर कर्जदार विनिर्दिष्ट वेळेच्या आत त्यांची दायित्वे संपूर्णपणे सोडविण्यास असमर्थ ठरल्यास, युएसएफबीएल अंतर्भूत सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याकरिता कायद्याच्या कलम 13 (4) अंतर्गत सर्व हक्कांच्या अमंलबजावणीस हक्कदार असेल, परंतु त्याखालील नियम आणि कायद्याअंतर्गत उपलब्ध अन्य कोणत्याही मार्गे विंनती करुन किंवा विक्रिद्वारा किंवा सदर मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या मर्यादेत आणि प्रदानाच्या वसुलीकरिता नाही. युएसएफबीएल कडे विक्रि किंवा हस्तांतरणाकरिता हक्कांचा वापर करण्यापूर्वी सुरक्षित मत्ता मोहोरबंद करणे आणि / किंवा जप्त करण्याचा अधिकारसुद्धा आहेत. सुरक्षित मत्तेच्या विक्रिनंतर, जर युएसएफबीएल च्या देय रकमेची वसुली अपुरी पडल्यास गहाण असलेल्या मालमत्तेच्या मूल्याबाबत उर्वरित देणींच्या वसुलीकरिता युएसएफबीएल कडे स्वतंत्र विधि प्रक्रिया सुरु करण्याचा हक्क सुद्धा आहे. हा कोणत्याही अन्य कायद्याअंतर्गत युएसएफबीएल कडे उपलब्ध अन्य सर्व अतिरिक्त आणि स्वतंत्र उपाय आहे. कायद्याच्या कलम 13(13) यापुढे आणि सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम 13(8) कडे कर्जदार यांचे लक्ष वेधीत आहोत, ज्यायोगे कर्जदार यांना युएसएफबीएल च्या पूर्व-लेखी परवानगीशिवाय, सुरक्षित मत्तेचा व्यवहार किंवा कोणत्याही सुरक्षित मत्तेची विक्रि, भाडेपट्टा किंवा अन्यथा कोणत्याही (अन्य सामान्य व्यवसायाखेरीज) तऱ्हेने त्याची वासलात लावण्यास मना केलेली आहे / प्रतिबंध करण्यात आले आहे आणि त्याचे अनुपालन न झाल्यास उक्त कायद्याच्या कलम 29 अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची निम्नस्वाक्षरीकाराकडे उपलब्ध आहे आणि कर्जदार, जर ते इच्छुक असल्यास, सदर प्रत नेहमीच्या कार्यालयीन वेळेत कामाच्या कोणत्याही दिवशी निम्नस्वाक्षरीकारांकडून गोळा करु शकतील.
स्वा./–
ठिकाण : महाराष्ट्र **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : 25.10.2026 **युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**